



**आकाशवाणी :** संत एकनाथ हाउसिंग सोसायटी परिसरातील कृष्णा हॉस्पिटल समोरच्या बाजूला कचऱ्याचा ढीग साचलेला आहे. परिसरात गणपतीचे मंदिर असून, अशा ठिकाणी कचरा, प्लॅस्टिकच्या पिशव्या, कागदाच्या पिशव्या, फेकलेले अन्नपदार्थ दिसून येतात. तसेच परिसरात रुग्णालय असल्यामुळे येथे रुग्णांची ये-जा असते. कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. प्रशासनाने गांभीर्याने दखल घेण्याची मागणी नागरिक करत आहे. आंबेडकरनगर परिसरातील सिमेंट रस्त्यांलगत या कायम कचरा पडून असतो. अशीच स्थिती शहरातील विविध सस्त्यांवर जागोजागी पाहावयास मिळते.

# रस्त्यांवरील कचरा उचलणार कोण?

## घंटागाडी गल्ल्यांतच : कंत्राटदाराची यंत्रणा करतेय निष्काळजीपणा

छत्रपती संभाजीनगर, ता. २२ : मागील महिनाभरापासून शहरात जागोजागी कचऱ्यांची ढिगारे आढळून येत असून दुर्गंधी वाढली आहे. महापालिकेची घंटागाडी गल्ल्यांमधूनच कचरा संकलन करताना दिसते. मात्र, काही रस्त्यांवरील कचरा उचलण्याकडे यंत्रणा दुर्लक्ष करत आहे. यामुळे संबंधित ठिकाणी कचऱ्यांची ढिगारे दिवसेंदिवस पडून राहत असल्याचे चित्र आहे. रस्त्यांवरील हा कचरा उचलणार कोण, असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

जुन्या शहरातील शहागंज, सिटी चौक, राजाबाजार, चंपाचौक, जिन्सी परिसर, जुना मोंढा, जुना बाजार, खोकडपुरा, शिवाजी हायस्कूल परिसर, पैठण गेट पार्किंग, रोषण गेट, आझाद चौक, आंबेडकरनगर, पिसादेवी रोड अशा विविध भागांत प्रामुख्याने रस्त्यांच्या कडेला जागोजागी कचऱ्याचे ढिगारे कायमच दिसतात. काही भागांत आठवडाभरातून एकदाच कचरा उचलला जातो. यामुळे कचऱ्याची दुर्गंधी सुटत असून त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. प्रशासक काळात रस्त्यांच्या कडेला आणून टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याच्या समस्येबाबत आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह घनकचरा विभागाच्या अधिकाऱ्यांना वारंवार लक्षात आणून दिल्यानंतरही चित्र बदलले नाही. आता महापौर समीर राजूरकर याकडे लक्ष देऊन यंत्रणेला कामाला लावतील, अशी नागरिकांना आशा आहे.

### शहरालगतच्या गावठाणात समस्या बिकट

शहराभोवतीच्या गावठाण असलेल्या वॉर्डांत तर कचऱ्याची समस्या अधिक बिकट आहे. हर्सूल, जटवाडा रोड, एकतानगर, भावसिंगपुरा, पडेगाव, मिटमिटा, ईटखेडा, सातारा, देवळाई, शिवाजीनगर, रामनगर, मुकुंदवाडी, चिकलठाणा, मकसूदनगर, नारेगाव, आरतीनगर, ब्रिजवाडी, जाधववाडी या भागांतून कचरा संकलनासाठी घंटागाडी वेळेवर पोचत नसल्याच्या तक्रारी आहेत.

### ५० मेट्रिक टन कचरा रोज रस्त्यांवर

- शहरात दररोज ४०० ते ४५० मेट्रिक टन कचरा निर्माण होतो. यातील सुमारे ३५० ते ४०० मेट्रिक टन कचरा नियुक्त कंपनीकडून कसाबसा संकलित केला जातो. उर्वरित ५० ते ६० मेट्रिक टन कचरा जागोजागी रस्त्याच्या कडेला, नाल्यांच्या कडेला तसाच पडून असतो. याविषयी तक्रारी करूनही तो उचलला जात नाही.

### घंटागाडी पोचत नसल्याने कचरा रस्त्यावर

- कधी कधी तीन-चार दिवसांतून एकदाच घंटागाडी येते. अशावेळी नागरिक कचऱ्याची दुर्गंधी सुटण्याच्या भीतीने घरातील ओला व सुका कचरा एकत्र करून रस्त्यांच्या कडेला आणून टाकतात. यामुळे शहराभोवतीच्या वसाहतींत जागोजागी कचऱ्याची ढिगारे कायम पडलेली दिसून येतात, असे हर्सूल येथील नागरिक सोमिनाथ औताडे यांनी सांगितले.

### आयुक्तांसह उपायुक्तांचा ‘नो रिस्पॉन्स’

- रस्त्यांलगत पडून राहणाऱ्या कचऱ्याच्या समस्येबाबत महापालिका आयुक्त जी. श्रीकांत, उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख नंदकिशोर भोंबे यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता ते उपलब्ध झाले नाही.

### प्रशासनाकडून या उपाययोजना आवश्यक

- कचरा संकलनासाठी घंटागाडी नियमित वेळेत यायला हवी.
- शहरालगतच्या वसाहतींसाठी योग्य कचरा व्यवस्थापन करावे.
- रस्त्यावरील कचरा संकलनाचे स्वतंत्र नियोजन करणे अपेक्षित.
- कचरा न उचलल्याची तक्रार आल्यास कंत्राटदाराला दंड करावा.
- नागरिकांना शिस्त लावण्यासाठी नागरी मित्र पथक सक्रिय करणे.

# कचरा संकलनासोबत कर वसुलीवरही नजर

## नव्या कंपनीला महापालिका आयुक्तांच्या सूचना

**छत्रपती संभाजीनगर, ता. २२ :** शहरात घरोघरी जाऊन कचरा संकलन आणि वाहतुकीचे कंत्राट महापालिकेने गुजरातच्या कंपनीला दिले. एक एप्रिलपासून कंपनीचे काम सुरू होणार असून, या पार्श्वभूमीवर आयुक्त जी. श्रीकांत यांनी कंपनीच्या कार्यालयाला भेट दिली. त्यात घरोघरी कचरा घेताना संबंधित मालमत्ताधारक कर भरतो किंवा नाही, याकडे लक्ष ठेवा. कर भरण्यासाठी नागरिकांना आवाहन करा, अशा सूचना केल्या.

शहरातील कचरा संकलन आणि वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी महापालिकेने नव्या ‘वेस्टर्न इमॅजिनरी’ या नवीन कंपनीची महापालिकेने नियुक्ती केली. बुधवारी (ता. १८) जी. श्रीकांत यांनी कंपनीच्या कार्यालयाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. यावेळी त्यांनी कचरा संकलनासोबतच मालमत्ता कर वसुलीसाठी कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा प्रभावी वापर करण्याचे निर्देश त्यानी दिले. कचरा संकलन करणारी वाहने जेव्हा नागरिकांच्या दारापर्यंत पोचतील, तेव्हा केवळ कचरा उचलून चालणार नाही, तर कचरा घेताना संबंधित मालमत्तेला महापालिकेचा अधिकृत मालमत्ता क्रमांक आहे का? याची पडताळणी करावी. ज्या मालमत्तांची अधिकृतता तपासलेली नाही, अशा मालमत्तांची माहिती मालमत्ता आणि कर आकारणी विभागाशी समन्वय साधून अद्ययावत केली जाईल. तसेच शहरातील कचरा संकलन प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी ‘पॉइंट ऑफ इंटरॲक्शन’ पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे. उघड्यावर कचरा साचणाऱ्या जागांची पाहणी करून अशी ठिकाणी नियमितपणे स्वच्छ करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. नागरिकांना स्वच्छता मोहिमेत सहभागी करून घेण्यासाठी आकर्षक ‘घोषवाक्य’ तयार करण्याच्या सूचनाही कंपनीला देण्यात आल्या.

### कामगारांना सुविधा द्या

रिफ्यूज ट्रान्सफर स्टेशनवर कर्मचाऱ्यांसाठी चहा-नाश्ता, स्वच्छतागृह, स्नानगृह आणि लॉकरची सोय केली जाणार आहे. सर्व कचरा डेपो आणि घंटागाडी पार्किंगच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करून तिचे मॉनिटरिंग स्मार्ट सिटी कार्यालयाशी जोडले जाईल. कंपनीने सर्व कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार पगार देणे बंधनकारक असून, आठवड्यातून एक दिवस सुटी देण्याचे नियोजनही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# कचरा संकलनाचा खर्च १ हजार १४५ कोटींवर!

## खासदार डॉ. कल्याण काळे यांच्याकडून नव्या निविदेवर प्रश्नचिन्ह

**छत्रपती संभाजीनगर, ता. २२ :** शहरातील कचरा संकलन व वाहतुकीसाठी महापालिकेने गुजरातच्या कंपनीची नियुक्ती केली. सध्या काम करणारी रेड्डी कंपनी आणि नव्या कंपनीच्या दरात मोठी तफावत असल्याने निविदा प्रक्रियेवर आक्षेप घेतले जात आहे. यासंदर्भात खासदार डॉ. कल्याण काळे यांनीदेखील शंका उपस्थितीत करून नव्या निविदेमुळे महापालिका आर्थिक संकटात सापडणार आहे. निविदेनुसार महापालिकेवर तब्बल १,१४५ कोटी रुपयांचा अवाढव्य आर्थिक भार पडणार आहे. निविदा अंतिम करताना करण्यात आलेले बदल देखील शंकास्पद असल्याचे डॉ. काळे यांनी नमूद केले.

नव्या निविदेसंदर्भात महापालिका आयुक्तांना दिलेल्या पत्रात डॉ. काळे यांनी २०१८ ते २०२६ या काळात ६०० टन कचरा संकलनासाठी २२५ कोटींचा करार करार करण्यात आला. नवीन निविदेसाठी ६०० कोटींचा अंदाज निश्चित करण्यात आला. मात्र, प्रत्यक्षात आलेल्या निविदांनुसार हा खर्च १,१४५ कोटींवर जाण्याची शक्यता आहे. हे दर सध्या कार्यरत असलेल्या एजन्सीच्या दरापेक्षा तीन पटीने जास्त आहेत. सुरवातीला एकाही कंपनीने निविदा भरली नव्हती. मात्र, अटी-शर्तींमध्ये बदल करून मुदतवाढ देताच, अवघ्या एका दिवसात तीन कंपन्यांनी निविदा सादर केल्या. या कंपन्यांमध्ये संगनमत असल्याची शंका डॉ. काळे यांनी उपस्थित केली. वाहनांच्या वयोमर्यादेबाबत १ एप्रिल २०२४ नंतरचीच वाहने असावीत अशी अट घालून अनुभवी स्पर्धकांना जाणीवपूर्वक अपात्र ठरवण्यात आल्याचा आरोप पत्रात करण्यात आला. आरटीएस सेंटर उभारणीचा खर्च महापालिका करणार असताना, ठेकेदाराला एवढा मोठा मोबदला देणे म्हणजे सार्वजनिक निधीचा अपव्यय असल्याचे काळे यांनी म्हटले. याप्रकरणीची माहिती तातडीने सादर करावी; अन्यथा उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात येईल, असा इशारा डॉ. काळे यांनी दिला.

### हे आहेत पाच प्रश्न

- निविदा प्रक्रिया तातडीने स्थगित का करण्यात आली नाही?
- जुना करार वैध असताना नव्या निविदेची घाई का केली?
- दरवाढीमुळे पडणाऱ्या आर्थिक भाराचे अधिकृत अंदाजपत्रक द्या?
- अटी-शर्ती निश्चित करताना निर्णय कोणत्या स्तरावर घेण्यात आले?
- महापालिकेला दिवाळखोरीपासून वाचवण्यासाठी आर्थिक हमी आहे का?

## अवतीभवती

### सीईटी परीक्षा मंगळवारपासून

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे २०२६ मध्ये घेतल्या जाणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पदवीपूर्व आणि पदव्युत्तर १७ व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा मंगळवारी २४ मार्च ते १६ मे या कालावधीत घेण्यात येत आहे. सध्या एमपीएड, एमएड व एमएचएमसीटी या तीन अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेची प्राथमिक प्रवेशपत्रे विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये ऑनलाइन उपलब्ध करून दिली आहेत. यातील एमपीएड या अभ्यासक्रमाची परीक्षा मंगळवारी (ता.२४) पासून सुरू होत आहे. या प्रवेश परीक्षेला यावर्षी २५२५ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरले आहेत. तर एम.एड. या अभ्यासक्रमाची परीक्षा बुधवारी (ता. २५) पासून सुरू होत आहे. या प्रवेश परीक्षेला यावर्षी ३,९८५ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरले आहेत. तर एमएचएमसीटी बुधवारी (ता. २५) होणाऱ्या या प्रवेश परीक्षेला यावर्षी ५५ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरले आहेत.

### लामणगाव शाळेला साहित्य भेट

**छत्रपती संभाजीनगर :** ‘मरावे परी कीर्ती रुपे उरावे’, या उक्तीला अनुसरून छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी स्वर्गीय वामनराव घुगे यांच्या स्मृतिप्रीत्यार्थ त्यांचे जावई शरद बांगर व परिवाराकडून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा लामणगाव (ता.खुलताबाद) या शाळेतील विद्यार्थ्यांना स्मार्ट टी.व्ही.भेट देण्यात आला. यावेळी प्रास्तविक गोपाल दुतोंडे यांनी तर संतोष बोबडे यांनी आभार मानले. यावेळी प्रभारी मुख्याध्यापक अशोक विघ्ने, सुमित्रा घुगे, शरद बांगर, दीपाली बांगर, व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर मालोदे, भागनकाका मालोदे, पालक बबन शिंदे, लक्ष्मण कोल्हे, अरुण रगडे, शिवाजी गायकवाड, सुरेश मालोदे, किरण वाहूळ, एकनाथ मालोदे यांची उपस्थिती होती.

### लोहगड हायस्कूलमध्ये बाल कविसंमेलन उत्साहात

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक कविता दिनाच्या निमित्ताने आडगाव सरक येथील लोहगड हायस्कूलमध्ये बाल कविसंमेलन शुक्रवारी (ता.२०) उत्साहात पार पडले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक व्ही.एम. लोळगे उपस्थित होते. जी.टी. पदार यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. तनुजा डुगले, ऋतुजा डुगले व कार्तिक घायट या विद्यार्थ्यांनी स्वलिखित सामाजिक, पर्यावरणीय व विनोदी आशय असलेल्या कविता सादर केल्या. या उपक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षेत ६९.३३ टक्के उपस्थिती

## स्पर्धा परीक्षा : शहरातील ३६ केंद्रांवर ३ हजार ५६९ उमेदवारांची दांडी

**छत्रपती संभाजीनगर, ता. २२ :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) औषध निरीक्षक, अन्न आणि औषधे प्रशासकीय सेवा गट-ब चाळणी परीक्षा २०२५ रविवारी (ता. २२) सकाळी ११ ते १२ या वेळेत शहरातील ३६ शाळा-महाविद्यालय केंद्रांवर झाली. या परीक्षेसाठी एकूण ११ हजार ६४० उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ८ हजार ७१ (६९.३३ टक्के) उमेदवारांनी परीक्षा दिली, तर ३ हजार ५६९ उमेदवार अनुपस्थित राहिले.

औषध निरीक्षकपदासाठी तब्बल दहा वर्षांनंतर परीक्षा होत असल्याने या परीक्षेत विद्यार्थ्यांची संख्या अधिक होती. तांत्रिक प्रश्नांवर आधारीत या परीक्षेच्या पेपर पॅटर्नमध्ये औषधनिर्माण (फार्मसी) विषयावर आधारित प्रश्नांना अधिक प्राधान्य देण्यात आले होते. सामान्यज्ञानावरील प्रश्नांचे प्रमाण तुलनेने कमी होते; तसेच विचारण्यात आलेल्या प्रश्नांची काठिण्य पातळी अधिक असल्याचे उमेदवारांनी सांगितले. औषधशास्त्राच्या प्रश्नांनी उमेदवारांना चांगलाच घाम फोडल्याचे उमेदवारांनी ‘सकाळ’ला सांगितले. काही प्रश्न लांबलचक असल्याने वेळेचे नियोजन करणे आव्हानात्मक ठरल्याचे परीक्षार्थींनी म्हणाले. दरम्यान, शहरातील सर्व केंद्रांवर परीक्षेची व्यवस्था सुरळीत होती. कोणताही अनुचित प्रकार न घडता परीक्षा यशस्वीरीत्या पार पडल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.



**छत्रपती संभाजीनगर :** एमपीएससीतर्फे घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक पदासाठीच्या परीक्षेतून बाहेर पडताना विद्यार्थी

# अकरावी प्रवेश यंदाही ऑनलाइन

## शाळांमध्ये मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याच्या सूचना

**छत्रपती संभाजीनगर, ता. २२ :** नव्या शैक्षणिक वर्षासाठी राज्यात अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीनेच राबवली जाणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाकडून तयारी सुरू करण्यात आली. दहावीची परीक्षा संपताच आता सर्व शाळांना मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याच्या सूचना शिक्षण विभागाकडून देण्यात आल्या.

अकरावीसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज अचूक आणि तत्काळ भरण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी शासकीय, अनुदानित विद्यालयांमध्ये मार्गदर्शन केंद्राची स्थापना करावी. माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रवेश अर्ज भरण्यासाठी साहाय्य करावे, विद्यार्थी, पालक, शाळा, विद्यालयांसाठी उद्बोधन वर्गांचे आयोजन करण्याच्या सूचना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे दिल्या. राज्य मंडळाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीसाठी प्रवेश घ्यायचा असेल, अशाच विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेश प्रणालीद्वारे अर्ज करावा, अन्य मंडळाशी संलग्न शाळांतून दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी राज्य मंडळ संलग्न महाविद्यालयातील अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज करता येईल, शेवटच्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेनुसार आणि निकषांनुसार ऑनलाइन पद्धतीनेच करण्यात येईल. या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही पद्धतीने शाळांना प्रवेश करता येणार नाही, असेही शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

### क्षमतेइतकेच प्रवेश द्यावे लागणार

अनेक खासगी स्वयंअर्थसहाय्यित व खासगी अनुदानित संस्थांकडून दरवर्षी अकरावी व बारावीच्या वर्गात क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश दिले जात होते. अनेक विद्यार्थी पैसे देऊन त्यांच्या सोयीने कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश घेत होते. मात्र, ते विद्यार्थी महाविद्यालयात जाण्याऐवजी खासगी कोचिंग क्लाससाठी दुसऱ्या जिल्ह्यात वर्षभर मुक्कामी जात होते. हा प्रकार आता ऑनलाइन प्रवेशामुळे कायमचा बंद होणार आहे. तसेच खासगी संस्थांना आता क्षमतेइतकेच प्रवेश द्यावे लागणार आहेत.



**कोकणवाडी परिसर :** ‘पं. विष्णू नारायण भातखंडे : सांगीतिक कार्य आणि कर्तृत्व’ तसेच ‘सेवानिवृत्त वृद्धांच्या समस्या’ या ग्रंथाच्या प्रकाशनाप्रसंगी डॉ. तुकाराम वांढरे, आमदार सतीश चव्हाण यांच्यासह इतर.

# देवगिरी महाविद्यालयात दोन ग्रंथांचे प्रकाशन

**कोकणवाडी परिसर, ता. २२ :** देवगिरी महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. २१) डॉ. तुकाराम वांढरे लिखित पं. विष्णू नारायण भातखंडे : सांगीतिक कार्य आणि कर्तृत्व तसेच सेवानिवृत्त वृद्धांच्या समस्या या दोन ग्रंथांचे प्रकाशन झाले.

यावेळी आमदार सतीश चव्हाण यांनी दोन्ही ग्रंथांचे कौतुक करत शैक्षणिक व संगीत क्षेत्रात या ग्रंथांची उपयुक्तता महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन केले. समाधान इंगळे यांनी डॉ. तुकाराम वांढरे यांची ही दोन्ही पुस्तके अनमोल ठेवा ठरतील, असे मत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दा.धों. काचोळे होते. यावेळी कवी प्रा. फमुं. शिंदे, गायक प्रा. राजेश सरकटे, संगीततज्ज्ञ डॉ. वैशाली देशमुख, त्र्यंबकराव पाथ्रीकर, प्राचार्य डॉ. रवी पाटील, बाबासाहेब वांढरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. तुकाराम वांढरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. जिजा शिंदे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर हिवरे, प्रा. अरुण काटे, प्रा. विजय नलावडे, डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते आदींची उपस्थित होती.

# जैवतंत्रज्ञानातील प्रगतीवर विचार मंथन

## न्याय सहायक विज्ञान विषयावर राष्ट्रीय परिषद

**पहाडसिंगपुरा, ता. २२ :** येथील शासकीय विज्ञान संस्था तसेच शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्थतर्फे जैवतंत्रज्ञान विभागात आरोग्य कृषी पर्यावरण व न्याय सहायक विज्ञान या विषयात जैवतंत्रज्ञानातील अलीकडील प्रगती या विषयावर राष्ट्रीय परिषद पार पडली.

उद्घाटन सत्रात महिको सीड्सचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. अंजनाभ भट्टाचार्य यांनी आधुनिक वनस्पती प्रजनन तंत्रज्ञानातील प्रेरित उत्परिवर्तन या पद्धतीचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. खुशबू भुरत यांनी जैवतंत्रज्ञान आणि संबंधित क्षेत्रांमध्ये बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व स्पष्ट केले. परिषदेच्या समारोप सत्रात नरेंद्र गोसावी यांनी रक्त, लाळ, केस, त्वचेच्या पेशी व उती यांच्यासारख्या जैविक पुराव्यांचे विश्लेषण करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. परिषदे दरम्यान संशोधन सादरी करणे, पोस्टर सत्रे आणि संवादात्मक चर्चासत्र घेण्यात आले. डॉ. हॅरीस पनक्कल यांनी प्रास्ताविक केले. स्पर्धेतील विजेते स्वाध्याय फटांगरे, चैतन्य इंगळे, अंजू पखाले, खान आफरीन, नकुल खरात, प्राची भोयर, मिर्झा अनाम, ऋतूजा घोरपडे. भित्तिपत्रक सादरीकरण स्पर्धेतील विजेते शिवानी अडागळे, विनोद बत्तीसे, ऐश्वर्या पटवर्धन, स्नेहल बनकर, सुरभी चौरसिया आणि वीरविंदर सिंग यांना सन्मानित करण्यात आले. संचालक डॉ. राजेंद्र सातपुते, डॉ. मायावती पाटील, डॉ. अंजली नाईक, डॉ. सुचिता भारंबे, डॉ. पूजा सोनवणे, डॉ. संदीप सांगळे, डॉ. आय.आर. गुप्ता, डॉ. राहुल भगत यांची उपस्थिती होती.


**पंजाब नैशनल बैंक** भारत सरकारचा उपक्रम | pnb | punjab national bank (A Govt. of India Undertaking)

**एआरएमबी, नाशिक**
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

**सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस**

**स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस**
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

**सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात**

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

| अ. क्र. | शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे | अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.१२.२०२५ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक | अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम | लिलावाचे दिनांक व वेळ | कर्जदारांच्या बोझाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शाखा - पीएनबी - समर्थनगर, औरंगाबाद (०७०९१०)** **कर्जदार-** **श्री. अशोक विठ्ठलराव साबळे** पत्ता - फ्लॅट नं. २०१, चिंतामणी ऑर्चिड, प्लॉट नं. १२५, सिटीएस नं. १६१३२, शिट नं. १८२, ज्योती नगर, औरंगाबाद-४३१ ००१ | १. फ्लॅट नं. २०१, चिंतामणी आर्चिड, प्लॉट नं. १२५, सिटीएस नं. १६१३२, शिट नं.१८२ ज्योती नगर, औरंगाबाद. **क्षेत्रफळ - ६०.७७३ स्क्वे.मी.** **मालकी हक्क नावे - श्री अशोक विठठ्लराव साबळे** **चतुःर्सिमा - उत्तर -** मोकळी जागा, **दक्षिण -** जिना, लॉबी आणि लिफ्ट, **पुर्व -** मोकळी जागा, **पश्चिम -** मोकळी जागा **मालमत्ता आयडी - PUNB000828800208** | अ) ०९.१२.२०२१ ब) रु. ३,०७,६१,८७८.९४/- + इतर व्याज + खर्च क) ०४.०१.२०२३ ड) सांकेतिक ताबा | अ) रु. ४२.९७ लाख ब) रु. ४.२९७ लाख (०७.०४.२०२६) क) रु. १.०० लाख | दि. ०७.०४.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत | माहित नाही |
| | | २. कमर्शियल कॉम्प्लेक्स हॉटेल आणि लॉजिंग बिल्डिंग "रवी कॉम्प्लेक्स" दुकान लोअर तळमजल्यावरील ए-०१ ते ए-०८ , तळमजल्या वरचे दुकान क्रमांक-बी-१ ते बी-०८ आणि पहिल्या मजल्यावरील कार्यालय ०१ ते ०८, गट क्रमांक १०६, प्लॉट क्रमांक १५ भाग, ग्रामपंचायत मिळकत क्रमांक २/४०१, अधुडे ऑटोमोबाईल ऑटो गॅरेजजवळ, दुर्गानाष्टा पॉइंटसमोर, अंबड-पाथरी रोड, गाव कुंभारपिंपळगाव, ता. घनसावंगी, जिल्हा-जालना. **क्षेत्रफळ - ३७२.०० स्क्वे.मी.** **मालकी हक्क नावे - श्री अशोक विठठ्लराव साबळे** **चतुःर्सिमा - उत्तर -** दौलतराव तौर, **दक्षिण -** प्लॉटचा दुसरा भाग, **पुर्व -** रस्ता, **पश्चिम -** अंबड- पार्थी रस्ता मालमत्ता आयडी - **PUNB000828800182** | अ) ०९.१२.२०२१ ब) रु. ३,०७,६१,८७८.९४/- + इतर व्याज + खर्च क) २८.१२.२०२२ ड) सांकेतिक ताबा | अ) रु. ७६.७१ लाख ब) रु. ७.६७१ लाख (०७.०४.२०२६) क) रु. १.०० लाख | | |

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, 07.04.2026 @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर https://baanknet.com वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया www.pnb.bank.in. आणि https://baanknet.com ही वेबसाईट पाहावी

दिनांक - २०.०३.२०२६
स्थळ - नाशिक

**टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य**

स्वाक्षरी/-
**श्री. वेंकेटेश एस.**
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)